## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १२९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २२/०२/२०१७

**१) मोटार सायकल ब्रेक मारुन चालक स्वत: व मागे बसणाऱ्यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २०/०२/२०१७ चे २२.०५ वा. दर. यातील आरोपी मोटार सायकल चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने, लापरवाहीने व निष्काळजीपणे चालवुन बावनकर चौक येथे ब्रेक मारुन खाली पडुन मोटार सायकल वर मागे बसनारा अमीत विनायक राव वय २२ वर्ष रा. नागपुर यास व स्वत: गंभिर जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने सरतर्फे फिर्यादी परीपोउपनि. सोनवाने यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३३७,३३८ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. शहारे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहे

**२) ट्रॅक्टर चालकांने ट्रॅक्टर लापरवाहीने चालवुन दोन महीला जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १७/०२/२०१७ चे १६.०० वा. दरम्यान. यातील जखमी फिर्यादीने ट्रॅक्टर चे ट्रॉलीवर लाखोरीचे पीक भरले व ट्रॅक्टर चालक आरोपी याने दुसऱ्या बांधीतील लाखोरीचे पीक भरने आहे असे म्हणुन ट्रॅक्टर सुरु करुन दुसऱ्या बांधीत हयगयीने, लापरवाहीने व निष्काळजीपने धुऱ्यावरुन नेऊन ट्रॅक्टर ची ट्रॉली कडावर करुन फिर्यादी आणी तिचे सोबत असलेली जोसना मानकर रा. आमगाव खुर्द यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी सौ. मंदा सुखनंदन गायकवाड वय ४० वर्ष, आमगाव यांचे तोंडी रिपोर्ट व ऍक्सरे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७,३३८ भांदवी. सहकलम १८४/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गोडंगे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**३) ट्रक चालकांने मोटार सायकलला धडक देवुन दोन जखमी . :–**

दिनांक २१/०२/२०१७ चे १७.३० वा. दरम्यान. यातील फिर्यादी विजय देवनाथ जांभुळे वय ५७ वर्ष, रा. शंकरपुर जिल्हा गडचिरोली हा आपल्या मोटार सायकल हिरो होन्डा बिना नंबरच्या गाडीवर विश्वनाथ वाल्दे वय ५५ वर्ष, रा. शंकरपुर यास बसवुन डबल सीट रोड कॉस करीत असतांना यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने लापरवाहीने चालवुन फिर्यादीचे मोटार सायकल ला एकोडी रोड येथे धडक मारुन फिर्यादी सोबत बसलेल्या इसमास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**४) अज्ञात मोटार सायकल चालकांच्या लापरवाहीने सायकल स्वारास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ०८/०२/२०१७ चे २१.३० वा. दरम्यान. यातील मृतक देवा चिंतामन बोरकर वय ४५ वर्ष, रा. बेला हा मुजबी वरुन सायकलनी बेला येथे एनएच ०६ रोडनी जात असतांना समोरुन येणाऱ्या यातील अज्ञात आरोपी मोटार सायकल चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल हयगयीने, लापरवाहीने व निष्काळजीपने चालवुन सायकल स्वारास धडक देवुन त्यास गंभीर जखमी केल्याने औषधोपचारा करीता नागपुर मेडीकल कॉलेज येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो. स्टे. अजनी नागपुर येथुन मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ चे कागदपत्र प्राप्त झाल्याने व पो. स्टे. भंडारा येथे अपघात रजीस्टर क्र. ०७/१७ चे चौकशी वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३०४(अ) भांदवी. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गायकवाड पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) अवैध दारु /जुगार अडयांवर धाडी . :–**

दिनांक २१/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. सिहोरा व भंडारा येथील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन १५ लिटर हातभट्टी दारु किंमती ९००/–रु. व जुगारातुन किंमती २८२/–रु. असा एकुण १,१८२/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

सपोनि. के. एम.हत्तीमारे
जि. वि. शा भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९४२२८३२१७८

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत. संगणक कक्ष.** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.